# ऐक्य

९१ वर्षांची वाचनीय परंपरा

ainikaikya.com सातारा बुधवार दि. २८/१/२०१५ रुपये २ email : news@d



पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय


## 'रयत'चे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे यांचे निधन



▲ **पुणे**, दि. २७ (प्रतिनिधी) : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे (वय ८६) यांचे सोमवारी रात्री अकराच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

रावसाहेब शिंदे १९५१ पासून कर्मवीर पाटील यांच्या सहवासात आले. त्यानंतर त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. ते १९७८ पासून रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष होते. रावसाहेब शिंदे यांचे शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान आहे. शिक्षणाचा हक्क प्रत्येकाला मिळावा यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. माजी केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे यांचे ते लहान बंधू होत.